# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

नवीन शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड नाशिक-रोड ,नाशिक

☎ : 2461479, Fax : 2455301 ई-मेल:-ronashik.dte@gmail.com.

Website :-www.dtensk.org

---

जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/ 1285 दिनांक :- 9 अगस्त AUG 2011

**प्रति,**

प्राचार्य/संचालक,
विनाअनुदानित अभ्यासक्रमाच्या
पदविका,पदवी,व पदव्युत्तर पदवी
अभियांत्रिकी/फार्मसी/एचएमसीटी/
वास्तुशास्त्र/एमबीए/एमसीए,अभ्यासक्रमाच्या पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
नाशिक विभाग.

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील **(EBC)** आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती करण्याबाबत...

**संदर्भ:-** शासननिर्णय ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.टिईएम/२००६/(४९६/०७) तांशि-१ दि.१० डिंसेबर २००७.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधीन शासननिर्णय क्र.१ नुसार आपल्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती करण्यासाठी जी कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.त्यानुसार विदयार्थ्यांचे ईबीसीचे अर्ज मागील वर्षापासून जो ईबीसी फॉर्मचा नवीन नमुना देण्यात आलेला आहे त्याच नमुन्यामध्ये विदयार्थ्यांचे अर्ज दोनप्रतीमध्ये खालील मार्गदर्शक सूचनाचा अवलंब करुन भरण्यात यावे.**सदर ईबीसी फॉर्मचा नमुना या कार्यालयाची वेबसाईट:- www.dtensk.org मध्ये वेबसाईटवर प्रकाशित केलेली सर्व पत्राखाली For more Letters please Click Here या वर क्लीक करुन Cilcular by R.O. मध्ये बरीच जुने पत्र ठेवलेली आहेत.त्यामध्ये दि.२१.११.२०१० या तारखमध्ये EBC Form and information 2010-11 या नावाने ईबीसी फॉर्मचा नमुना व इतर मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत.** त्यानुसार चालु शैक्षणिक वर्षाचे ईबीसीचे अर्ज विदयार्थ्यांकडून भरुन घेण्यात यावेत.

१) संस्थेने विदयार्थ्यांचे या पत्रासोबतच्या संचालनालयाने पाठविलेल्या मार्गदर्शक सूचनाची नोंद घेवून सोबतच्या विहीत नमुन्यात अर्ज व संबधित कागदपत्रे.

२).विदयार्थ्यांच्या पालकांचा आर्थिकवर्ष सन २०१०-११ या वर्षातील उत्पन्नाचा रु. १,००,०००/- आतील तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला.

**३.तलाठी,संरपंच,ग्रामसेवक,सरकारी/निमसरकारी कर्मचारी यांचे पगारदाखले,तसेच फॉर्म नं. १६ वरील उत्पन्न ग्राह्य धरले जाणार नाही याची नोंद ध्यावी.फक्त तहसिलदाराने निर्गमित केलेले रु.१,००,०००/- आतील उत्पन्न दाखले अर्जासोबत असणे आवश्यक आहे.तसेच इतर संबधित कागदपत्रे उदा.गुणपत्रिका,रेशनकार्ड, रहिवाशी,अपत्य दाखला, इ. कागदपत्राच्या सांक्षाकित छांयाकित प्रत जोडणे आवश्यक आहे.**

४.पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामधील पात्र व खुला सवर्गातील विदयार्थ्यांकरिताच ही सवलत देय राहील.व सदर अभ्यासक्रमातील केंद्रीभूत प्रवेशप्किया (CAP) मधून आलेले विदयार्थीच पात्र राहतील. संस्थास्तरावरील कोणतेही प्रवेशातील विदयार्थी (Against Cap,Instiute Level) सदर सवलतीसाठी पात्र राहणार नाही तसेच सदर ईबीसी सवलत ही एम.फार्म,एम.ई.,एम.टेक या अभ्यासक्रमामधील विदयार्थ्यांना लागू नाही यांची नोद ध्यावी.

५).विदयार्थ्याचे सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्ज सर्व संबधित कागदपत्रासह दोन प्रतीत भरुन घेणे आवश्यक आहे.या कार्यालयामध्ये फक्त एकच प्रत प्रस्तावासोबत प्रत्येक विदयार्थ्याची पाठवावी व एकप्रत आपल्या कार्यालयात ठेवावी.संचालनालयाचे तपासणी पथक आल्यानंतर सर्व विदयार्थ्यांचे अर्ज व वाटप केलेल्या रक्कमा इ.दाखविणे संस्थेची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

६).सदर विदयार्थी हा महाराष्ट्रातील अधिनिवासी असला पाहिजे सदरची योजना ही फक्त महाराष्ट्र राज्यातील विदयार्थ्याकरिताच लागू आहे.त्यामुळे इतर राज्यातील विदयार्थ्याचे अर्ज सादर करण्यात येवू नये.

७).या कार्यालयाकडून मंजूर करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीची छांयाकित प्रत (शैक्षणिक वर्ष २००७-०८ , २००८-०९ ,२००९-१० व २०१०-११)सदर यादयामध्ये ज्या खुल्या संवर्गातील विदयार्थ्यांना सदर सवलत मंजूर करावयाची आहे त्यांचे नावाखाली ठळक अधोरेखाकिंत करावे.

<u>**८).शिक्षण शुल्क समितीने शैक्षणिक वर्ष २०११-१२ करिता निश्चीत केलेल्या शैक्षणिक शुल्कांच्या पत्राची छांयाकित प्रत. प्रस्तावासोबत प्रत्येक संस्थेने जोडावी. आणि फक्त शिक्षणशुल्क(TutionFee) च्या ५० टक्के रक्कमेचे प्रस्ताव सादर करावे.विकास शुल्क (Development Fee) शिक्षणशुल्क समितीने निश्चीत केलेल्या शुल्कामधून वगळण्यात येवून फक्त शिक्षणशुल्क(TutionFee) च्या ५० टक्के रक्कमेचे प्रस्ताव सादर करावे याची नोंद घ्यावी.**</u>

<u>**९).ज्या संस्थानी मागील वर्षाच्या प्राप्त ईबीसीच्या धनादेशाच्या विदयार्थ्याना वाटपाचा हिशोब/ विदयार्थ्याचे व प्राचार्याचे सहयाचे उपयोगिता प्रमाणपत्र अदयापपर्यत या कार्यालयास सादर केलेले नाही, अशा संस्थाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाही व त्यांची तरतूद संचालनालयाकडे केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**</u>

१०) विदयार्थ्याना कोणत्याही एकाचप्रकारची शिक्षणशुल्क सवलत देय असते याची नोंद संस्थाप्रमुखानी विदयार्थ्याचे अर्ज भरुन घेताना काळजी घ्यावी. (Minority Scholarship)व इतर कोणत्याप्रकारची स्कालरशिप घेत असल्यास सदर विदयार्थ्याचे ईबीसीचे अर्ज घेवू नये.या बाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याचीही नोंद घ्यावी.

११) ज्या विदयार्थ्यांनी ११ वी व १२ वी परिक्षा पास करुन पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेतला असेल अशा कोणत्याही विदयार्थ्याचे सदर ईबीसी सवलत देय राहणार नाही.

१२) विदयार्थ्याची यादी तयार करतांना विदयार्थ्याचे नाव अभ्यासक्रम व शिकतअसलेले वर्ष (वर्ग),शिक्षणशुल्क समितीने निश्चीत केलेली शिक्षणशुल्क फी,व शेवटचा रकाना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के देय असलेली रक्कम अशाप्रकारे यादया वर्षनिहाय म्हणजेच प्रथमवर्ष,द्वितीयवर्ष,तृतीयवर्ष व चतुर्थवर्ष याप्रमाणे तयार करुन त्यांची एकूण रक्कम शेवटी घ्यावी.सदर रक्कम सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे जुळली पाहिजे.

चुकीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नये, याबाबत विभागीय कार्यालयास/संचालनालयास तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपली राहील याची नोंद घ्यावी.

<u>**या कार्यालयाचे प्रस्ताव सादर करण्याचा दिंनाक दिल्यानंतरच या कार्यालयामध्ये प्रस्ताव हस्तदेय सादर करण्यात यावेत व अपुर्ण कागदपत्रे असलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाही, यांची नोंद घेण्यात यावी.**</u>

**सहपत्रः**-विहीत नमुन्यातील ईबीसीचे अर्ज व प्रपत्रे वरील पत्रामधील
या कार्यालयाच्या वेबसाईटवरील दिलेल्या ऑप्शनमध्ये बघावे.

(दि.रा.नंदनवार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.